ISSN 2319-9318

UGC Sponsored

International Multilingual Research Journal

# Printing Area

Special Issue March 2019

Jr.No.43053 UGC Approved Refereed Journal


## ONE DAY INTERDISCIPLINARY INTERNATIONAL CONFERENCE

on

# MAHATMA @ 150

on

2nd March 2019



Organized by

**Gandhi Study Centre**

New Arts, Commerce & Science College,
Wardha, Maharashtra (India) - 442 001

Scanned with CamScanner

## = Index =

1) महात्मा गांधींजींचे जनआंदोलनाचे विविध तंत्र 1
डॉ. अभिलाषा राऊत, सहा. प्राध्यापिका, नागपूर
=============000=============
2) आधुनिक भारताचा शाश्वत विकास गांधीविचारात. 5
प्रा.डॉ. अषोक भानुदासराव केंद्रे, मराठी विभाग प्रमुख, गंगाखेड जि.पतभणी.
=============000=============
3) महात्मा गांधीजीचे सत्याग्रहासंबंधीचे विचार 7
प्रा. भारती दि. रत्नपारखी/चिमूरकर, सहा. प्राध्यापक(मराठी) चंद्रपूर
=============000=============
4) पत्रकारिता आणि महात्मा गांधी 10
प्रा. डॉ. मोहन राजाराम कापगते, इतिहास विभागप्रमुख, ब्रम्हपुरी
=============000=============
5) कर्मयोगी गांधी 14
प्रा.मंजुषा कृ. वरफडे, सेवाग्राम,वर्धा
=============000=============
6) स्वदेशी चळवळ 17
डॉ. मेघा सबाने, सहायक प्राध्यापक, पुलगाव जि वर्धा
=============000=============
7) महात्मा गांधीचे धार्मिक विचार 20
प्रा. डॉ.मिलींद भगत, सहा. प्राध्यापक, प्रा.मनोज सोनटक्के सहायोगी प्राध्यापक
=============000=============
8) महात्मा गांधीजींचे रचणात्मक कार्यक्रम 23
डॉ. नारायण एम. वघाळे, ग्रंथपाल, नरखेड
=============000=============
9) महात्मा गांधी व सत्याग्रह वर्तमानातील उपयोगिता 28
प्रा. निखील एम. देशमुख, साहायक प्राध्यापक, चंद्रपूर
=============000=============
10) जागतिक षांततेच्या परिप्रेक्षात गांधीविचार 31
डॉ. प्रकाष शेन्डे, सहयोगी प्राध्यापक, चंद्रपूर (महा.)
=============000=============
11) महात्मा गांधी आणि स्थानिक स्वराज्य संस्था 33
डॉ. प्रा. प्रविण कोहळे, सहाय्यक प्राध्यापक, महानरखेड, जि. नागपूर
=============000=============
12) महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता 35
डॉ. पुरूशोत्तम माहोरे, Assistant Professor, चंद्रपूर
=============000=============
13) महात्मा गांधींचे अहिंसेविषयी विचार 39
प्राचार्य डॉ.सौ.पुष्पा तायडे, वर्धा
=============000=============
14) महात्मा गांधीजीचे खादी विषयक विचार 42
प्रा. राहुल लभाने, सहाय्यक प्राध्यापक – अर्थशास्त्र विभाग प्रमुख



Scanned with CamScanner

15) ग्रामीण विकासात महात्मा गांधीजींचे योगदान 47
प्रा. डॉ. राजेंद्र माणिकपुरे, रोहणा, ता. आर्वी, जि. वर्धा
=============000=============
16) महात्मा गांधीजींची ग्रामविकास संकल्पना 49
प्रा. राजू भाऊरावजी खरडे, कोंढाळी जि. नागपूर
=============000=============
17) सत्याग्रहामध्ये लोकषाहीची भूमिका 51
प्रा. डॉ. सुचिता एस. ढेरे, यवतमाळ
=============000=============
18) भूदान चळवळीचे आर्थिक व सामाजिक परिणाम 54
प्रा. डॉ. सुनिल एन. ढेरे (असो. प्राध्यापक) बोरी अरब, ता. दारव्हा जि. यवतमाळ
=============000=============
19) खादी: आत्मनिर्भरता व स्वदेशीचे प्रतिक 57
सुषमा मा. लोखंडे
=============000=============
20) महात्मा गांधीजींचा स्त्रीविषयक दृष्टीकोन 61
डॉ. कु. स्वाती विठ्ठलराव चोरे, वरूड
=============000=============
21) परिवर्तनाचे साधन : एकादश व्रत 64
डॉ. वैषाली उगले, पिपरी – वर्धा
=============000=============
22) गांधीजींचे आर्थिक विचार 66
डॉ. विभावरी बा.हाते, ग्रंथपाल, मूल
=============000=============
23) महात्मा गांधी व अस्पृश्यता 68
प्रा. विजय वाघमारे, मराठी विभाग प्रमुख, वणी, जि. यवतमाळ
=============000=============
24) महात्मा गांधीजीची सत्याग्रह आणि अहिंसा 70
प्रा. विनोद मारोतराव मुडे, सहाय्यक प्राध्यापक वडनेर, ता. हिंगणघाट जि. वर्धा
=============000=============
25) महात्मा गांधीजीचे आर्थिक विचार 75
डॉ. विठ्ठल घिनमिने, सहाय्यक प्राध्यापक, वडनेर ता. हिंगणघाट, जि. वर्धा
=============000=============
26) 'लोकशाही रूजविण्यास गांधीजींच्या सत्याग्रहाची भूमिका' 78
प्रा. डॉ. कल्पना आर. टेकाडे, सहयोगी प्राध्यापक, भामटी, रिंग रोड, नागपूर
=============000=============
27) महात्मा गांधींचे सत्याग्रह व अहिंसा तंत्र 81
प्रा. मंगला कडवे, नरखेड
=============000=============
28) महात्मा गांधीची ग्रामविकासाची संकल्पना 83
प्रा. डॉ. मनोज श्रीकृष्णवार पवार, नरखेड
=============000=============



Scanned with CamScanner

29) ग्रामीण विकासात महात्मा गांधीचे विचार आणि सद्यस्थिती 85
प्रा. डॉ. प्रशांत रा. देशमुख नरखेड

=============000=============

30) गांधी विचाराची वर्तमानातील सार्थकता मूलभूतता 88
पूनम तडस, संशोधक

=============000=============

31) महात्मा गांधींचे सर्वोदयासाठी पनुर्निमाण कार्य 90
प्रा. रुपेश रा. कुचेवार, सहाय्यक प्राध्यापक, वर्धा

=============000=============

32) महात्मा गांधीजीची विचारसरणी आणि सर्वोदय चळवळ 93
प्रा. सिध्दार्थ बी. टेंभूर्णे, उमरेड जि. नागपूर

=============000=============

33) स्वदेशी व सत्याग्रह गांधीजीची विचार प्रणिती 96
स्नेहा ब. सातघरे, संशोधक

=============000=============

34) राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या सामाजिक विचाराची प्रासंगिकता 98
प्रा. सुधीर वि. बानुबाकोडे, राज्यशास्त्र विभागप्रमुख शेंदुरजनाघाट

=============000=============

35) महात्मा गांधी यांचे ग्रामस्वराज्या विषयी दृष्टीकोण एक अभ्यास 101
प्रा. सुनिल शंकरराव गोईनवाड, सहाय्यक प्राध्यापक, नांदेड

=============000=============

36) महात्मा गांधी : शिक्षण विषयक विचारांची प्रासंगिकता 104
सुषमा वि. आदमने, शोधकर्ती

=============000=============

37) 'महात्मा गांधीचे रचनात्मक कार्यक्रम' 107
प्रा. विनोद बी. खेडकर, सहाय्यक प्राध्यापक, भामटी, रिंग रोड, नागपूर

=============000=============

38) महात्मा गांधीच्या रचनात्मक कार्यातून स्वालंबन व स्वराज्य 110
योगिता झिलपे, शोधार्थी

=============000=============

39) महात्मा गांधींच्या सत्याग्रहाच्या प्रयोगाचे विश्लेषणात्म अध्ययन 114
डॉ. अफरोज हनिफ शेख, कार्यकारी प्राचार्य, नागपूर

=============000=============

40) महात्मा गांधीजींच्या दृष्टिकोनातील ग्रामीण अर्थव्यवस्था 116
प्रा. डॉ. बळीराम प. अवचार, सहाय्यक प्राध्यापक, खडकी अकोला

=============000=============

41)गांधीजी आणि खादी 119
Dr. Nitin V. Changole, HOD. Dept. of History, Amravati

=============000=============

42) महात्मा गांधी आणि त्यांच्या शैक्षणिक विचारांची विशिश्टता आणि प्रासंगिकता 122
कैलाश वि. बिसांद्रे (सहाय्यक प्राध्यापक) वर्धा

=============000=============

43) सत्याग्रह–लोकशाहीला पुरक 127
प्रा. लक्ष्मण शा. पवार, वरुड



Scanned with CamScanner

44) स्त्री योगदानात गांधी विचारांचा प्रभाव 129
प्रा. लिना विठ्ठलराव पुसदेकर, समाजकार्य विभाग, वर्धा
=============000=============

45) गांधीजींचे पुनर्निर्माण कार्य 132
डॉ. निलेष प्र. हरणे, सा. प्राध्यापक, नरखेड
=============000=============

46) गांधीजींचे पुनर्निर्माण कार्य 134
प्रफुल ढोके, सा. प्राध्यापक, नरखेड
=============000=============

47) स्त्रीसशक्तीकरणात गांधीजींचे विचार 137
प्रा. रश्मी अशोकराव पडङ्के, समाजकार्य विभाग, वर्धा
=============000=============

48) महात्मा गांधींचे शिक्षण क्षेत्रातील योगदान 139
कु. रूपाली विश्वनाथ खराडे, संशोधक विद्यार्थी, झुनझुनु, राजस्थान
=============000=============

49) महात्मा गांधीजीचे सर्वोदयी तत्वज्ञान 142
प्रा.डॉ.कदम संतोष तुकाराम, इतिहास विभाग प्रमुख, कोल्हापूर
=============000=============

50) "वर्तमान युगात गांधीवादी चळवळींची स्थिती" 144
प्रा. डॉ. सुधाकर जावळे, सहयोगी प्राध्यापक, पारशीवनी, जिल्हा, नागपूर
=============000=============

51) भुदान चळवळीचे समाजिक, आर्थिक परिणाम 147
प्रा. राधेश्याम शंकराव ठाकरे, नागपूर
=============000=============

52) गांधी विचाराची प्रासंगिकता आणि मौलिकता 149
तृप्ती दि. किटे, शोधार्थी
=============000=============

53) असहकार चळवळ आणि म.गांधी 153
प्रा.विजय रामदास तिरपुडे, अंजनगाव सुर्जी जि.अमरावती
=============000=============

54) महात्मा गांधीजी समाजोपयोगी 155
प्रा. विनोद एन. तेलमोरे, वरूड, जि.अमरावती
=============000=============

55) महात्मा गांधी प्रणीत ग्रामस्वराज्य 157
आकाष शेषराव बांगर, संशोधक विद्यार्थी, हिंगोली
=============000=============

56) महात्मा गांधी आणि हरिजन चळवळ 159
प्रा. डॉ. दयानंत उ. भास्करराव, खामगांव
=============000=============

57) महात्मा गांधीचा विश्वाला पाहण्याचा दृष्टिकोन (वैश्वीक) 161
प्रा. हितेश मा. दडमल, सहाय्यक प्राध्यापक, नागपूर
=============000=============

58) गांधी गांधीवादी विचार परंपरेनुसार राजकारण आणि धर्म 165
प्रा. जगदीश रामदास चिमुरकर, प्रा.डॉ. प्रमोद शंभरकर, चंद्रपूर




Scanned with CamScanner

59) महात्मा गांधींचा स्त्रीविषयक दृष्टीकोन 167
डॉ. साधना जिचकार, भारसिंगी

==============000==============

60) महात्मा गांधी यांचे सत्याग्रही विचार 171
डॉ. लोकेश बी. नंदेश्वर, सहा.प्राध्यापक, वर्धा

==============000==============

61) महात्मा गांधीजींचा आरोग्यविषयक दृष्टीकोन 174
प्रा.डॉ.वीणा आर.मेंढुले, विभागप्रमुख–गृहअर्थशास्त्र, समुद्रपूर जि.वर्धा

==============000==============

62) स्त्री शिक्षा आणि गांधी विचारधारा 179
**Dr. Maya M. Wankhade**. HOD. Dept. of History Chandur Rly.

==============000==============

63) महात्मा गांधींचे विचार 181
प्रा.रीता द.वाळके(डंभाळे), भारसिंगी,ता.नरखेड,जि.नागपूर

==============000==============

64) सत्याग्रह व लोकशाहीची भूमिका 184
डॉ. सुभाष गिरडे, चंद्रपूर / प्रा. संदिप गिरडे, वर्धा

==============000==============

65) महात्मा गांधी आणि स्वदेशी चळवळ 190
प्रा. सुधाकर माटे, उमरेड

==============000==============

66) महात्मा गांधी यांचे ग्रामस्वराज्य, अर्थकारण विचार 194
**डॉ. वंदना पळसापुरे**, मराठी विभाग प्रमुख वर्धा

==============000==============

67) म. गांधीच्या ग्रामस्वराज्यविषयक विचारांची प्रासंगिकता 196
प्रा. गजानन घुमडे सहाय्यक प्राध्यापक मूल

==============000==============

68) महात्मा गांधींचा सत्याग्रह : एक अभ्यास 199
प्रा. मनोहर शामराव वागतकर, ता. जि. अकोला

==============000==============

69) गांधीजींचे तंत्र सत्याग्रह आणि अहिंसा : एक अध्ययन 201
प्रा. नवनाथ बडे,

==============000==============

70) महात्मा गांधीजींचे शैक्षणिक विचार 204
प्रा. डॉ. रावसाहेब श. ठोक,

==============000==============

71) म. गांधीजींच्या दृष्टिकोनातून शिक्षणाचे महत्व 207
प्रा. डॉ. रफिक शेख देवळी, वर्धा

==============000==============

72) महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार : काळाची गरज 209
प्रा.डॉ.अशोक टिपरसे,.नांदेड.

==============000==============

73) महात्मा गांधींची मूल्यशिक्षा प्रणाली 212
डॉ. सी.डी. पाखरे सहयोगी प्राध्यापक, वरुड जिल्हा. अमरावती.

==============000==============



Scanned with CamScanner

**74)** स्वदेशी चळवळ 214
डॉ. कु दयाश्री वि. कोकाटे अमरावती.
=============000=============
**75)** संविधानातील मूलभूत हक्क व कर्तव्ये 215
प्रा. सुरेश एम. पवार, पिपरी-वर्धा
=============000=============
**76)** महात्मा गांधी आणि स्वदेशी विचार 217
प्रा. प्रमोद वा. तडस ग्रंथपाल, वर्धा
=============000=============
**77)** महात्मा गांधीचे महिला विषयक विचार 218
डॉ. प्रमोद मा. आचेगावे, वर्धा
=============000=============
**78)** "महात्मा गांधी आणि असहकार आंदोलन" 220
प्रा. डॉ. राहुल वि. दखणे,पांढरकवडा
=============000=============
**79)** म.गांधीचा सत्याग्रह विचार 222
प्रा.डॉ.आंधळे बी.व्ही., सोनपेठ
=============000=============
**80)** महात्मा गांधी व असहकार चळवळ 224
प्रा.एस.एन. ठाकरे @ सहा.प्रा.नासीर कासम शेख सवना जि.यवतमाळ
=============000=============
**81)** महात्मा गांधीजी आणि अस्पृश्यता निवारण 226
प्रा. डॉ. सुजाता बळवंत सबाने सहयोगी प्राध्यापक, अमरावती
=============000=============
**82)** महात्मा गांधीच्या विचारांची उपयुक्तता 228
प्रा.डॉ.मानवते उत्तम हुसनाजी, हनेगाव ता.देगलूर जि.नांदेड
=============000=============
**83)** महात्मा गांधी यांची असहकार चळवळ 231
आरती प्रकाशराव भांगे, अमरावती
=============000=============
**84)** गांधीजींच्या पुनर्निर्माणकार्यात सामाजिक न्यायाची प्रतिमा 233
प्र. प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, वाशिम
=============000=============
**85)** महात्मा गांधीच्या स्वदेशी चळवळीचे ऐतिहासिक अध्ययन 235
प्रा.डॉ.प्रमोद रामेश्वर चव्हाण खामगांव जि.बुलडाणा (म.रा)
=============000=============
**86)** गांधी आणि खादी 237
प्रिया भिमराव कांबळे, अमरावती
=============000=============
**87)** महात्मा गांधीचे सत्याग्रही धोरण 238
प्रा.सौ.कांबळे एस.एस., हनेगाव ता.देगलूर जि.नांदेड
=============000=============
**88) महात्मा गांधी व निसर्गोपचार** 242
**डॉ. मनिषा विनायक शिरोडकर, सातारा**
=============000=============



Scanned with CamScanner

89) गांधी विचार बुनियादी शिक्षा शास्त्र – नई तालीम 246
आकाश तोडासे, शोधकर्ता
============000============
90) महात्मा गांधीचे जीवन दर्शन आणि वैश्विकता 248
खुशाल ज्ञानेश्वर कारमोरे, रिसर्च स्कॉलर
============000============
91) गांधींची शस्त्रे–सत्य आणि अहिंसा 250
शार्दूल नामजोशी, रिसर्च स्कॉलर
============000============
92) महात्मा गांधीजींचे खादी विषयक विचार 251
प्रा. दिनेश भास्कराव खेरडे, शेंदुरजना घाट, जि. अमरावती
============000============
93) लोकोत्तर नेता – महात्मा गांधी 253
प्रा.डॉ. गणेश भि. मोहोड, कारंजा (घा.) जि. वर्धा
============000============
94) महात्मा गांधींच्या कार्याची पूर्वपिठीका : आफ्रिकेतील कामगिरी 255
प्रा.डॉ. स्मिता म. जाधव, कुऱ्हा, जि. अमरावती
============000============



Scanned with CamScanner

**39**

## महात्मा गांधींच्या सत्याग्रहाच्या प्रयोगाचे विश्लेषणात्म अध्ययन

**डॉ. अफरोज हनिफ शेख**
कार्यकारी प्राचार्य व इतिहास विभागप्रमुख
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय,
उमरेड रोड, नागपूर.

"The greatest political Genius of our time", असे महात्मा गांधीबद्दल आइन्स्टीनने म्हटलेले आहे. आइन्स्टीन प्रमाणोच जगातील अनेक प्रमुख व्यक्तींनी गांधीजींना अनेक उपमा लावल्या आहेत. नेताजी सुभाषचन्द्र बोस यांनी गांधीजींना "Father of our Nation" असे म्हटले आहे. इतकच नव्हे तर रवीन्द्रनाथ ठाकुरांनी या विश्वकवीने म. गांधींविषयी लिहिले, "...... Here was living truth at last, and not only quotations from books ........ who else has felt like him that all Indians are his own flesh and blood?........ At Gandhi's call India blossomed forth to new greatness just as before, in earlier times, when Buddha proclaimed the truth of fellow-feeling and compassion among all living creatures."

महात्मा गांधीजींनी ज्या 'सत्याग्रहाचा' प्रयोग केला, त्यांचा सत्याग्रह समजून घ्यावयाचा असेल तर त्यांच्या 'नैतिक' किंवा 'धार्मिक' समजुतींच्या पार्श्वभूमीवरच तो समजून घ्यायावयास हवा, जेव्हा ते दक्षिण आफ्रिकेच्या राजकारणात शिरले, तेंव्हा त्यांच्या धर्मजीवनाची साधारण दिशा ठरली होती आणि त्यातील काही तपशील म्हणजे त्यांच्या काही धर्मनिष्ठा आणि काही धर्माचार स्थिर झाले होते. पुढे दक्षिण आफ्रिकेतील लढा चालवीत असता त्यांना सत्याग्रहाचे साधन सापडत गेले आणि जन्मभर त्या साधनाचा ते विकास करीत राहिले. थोडक्यात आत्मिक बलाने शारीरिक बल जिंकण्याची, मानवाच्या परिवर्तनाची, सत्याग्रह ही एक विलक्षण प्रक्रिया होती. म्हणूनच ई.स. १९१९ मध्ये हिन्दुस्थानात सत्याग्रह सुरू करताना गांधीजी म्हणाले होते की, "There is a fundamental difference between their civilization and ours. Then Westerners believe in the doctrine of violence or brute force as final arbiter. My reading of our civilization is that we are expected to believe in soul force or moral force as the final arbiter and this is satyagraha. म्हणजेच सत्याग्रहांच्या या वैशिष्ट्यात म. गांधीजींची धार्मिक दृष्टी प्रतिबिंबित झाली हाती. अन्यायाचा जो प्रतिकार करायचा तो 'प्राणपणाने' करायचा; आत्मक्लेश नि आत्मोन्नती ही आवश्यक मानायची, प्रतिपक्षाचे हृदय परिवर्तन करायचे आणि अहिंसेचे परिपालन करून प्रत्याघातापासून अलिप्त राहायचे.

afrozsheikh1266@gamil.com

म. गांधीच्या सत्याग्रहातूनच अहिंसेचा उदय झाला, असे दिसते पण याचा आशय असा नव्हे की ते रक्तपात किंवा हिंसाचाराला घाबरत होते. या आधी त्यांनी बोअर–युद्धात (१८९९–१९००) रक्तपात बघितला होता. तसेच रूग्णवाहक म्हणून का होईना पण परमधैर्याची प्रशस्ती मिळविली होती. तेंव्हा, रक्ताची भीती म्हणून नव्हें, तर मानवी जीवनाचे प्रेम व करूणा म्हणून ते अहिंसेचा पुरस्कार करीत होते. या अहिंसा धर्मालाच राजकीय विचारांचे पाठबळ मिळाले.

म. गांधी आपल्या अहिंसेच्या तत्वामुळेच राष्ट्रीय काँग्रेसच्या नेमस्तांपासून व क्रांतिकारकांपासून दूर राहिले कारण क्रांतिकारकांचा व नेमस्तांचा मार्ग शेवटी हिंसेकडे जातो, असा त्यांचा समज होता. म्हणूनच त्यांनी म्हटले आहे – "I share the National spirit, but I totally dissent from the methods, whether of the extremist or of the moderates for either party relies on violence ultimately."

गांधीजींच्या सत्याग्रहाला लोकजागृतीचे आणि समता प्रस्थापनेचे यश दक्षिण आफ्रिकेत मिळाले आणि त्यांचा अहिंसक सत्याग्रह पक्का झाला. जर दक्षिण आफ्रिकेत यश मिळाले नसते तर सत्याग्रहाचे उपयोजन अखिल भारतीय राजकारणात त्यांनी कदाचित केले नसते. गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेतील लोकांचे आत्मिक बळ जागे केले आणि त्यांना अन्यायाच्या प्रतिकारासाठी उभे केले. त्यांना खऱ्या अर्थाने आत्मभान दिले आणि त्यांना आत्मभिमानी बनविले.

ई. सन १८९३ पासून १९०६ पर्यंत महात्मा गांधी समाजजागृतीचे कार्य व विषमते विरूद्ध आवाज उठवित होते. जेंव्हा ट्रान्सवाल सरकारने



Scanned with CamScanner

काढलेल्या १९०६ च्या हुकूमाप्रमाणे ८ वर्षावरील सर्व हिंदी लोकांना स्वतःची नोंद करून वास्तव्याचा परवाना घ्यावा व जवळ बाळगावा, अशी सक्ती करण्यात आली आणि पोलिसांना परवाना तपासण्याची परवानगी होती. ह्या हुकूमाविरूद्ध म. गांधी आपल्या भाषणात म्हणाले होते, "ज्यांना प्रतिकाराचे सामर्थ्य नसेल त्यांनी शपथ घेऊ नये. पण शपथ घेतली की माघार नाही. विजय ही एकच समाप्ती या लढ्याला असली पाहिजे. मला जरी मुठभर लोकांची साथ मिळाली तरी मी माझ्या जागी ठासून उभा राहीन. मरण स्वीकारीन; पण शरण जाणार नाही." म्हणजेच प्राण पणाला लावण्याची प्रतिज्ञा त्यांनी खऱ्या अर्थाने ह्या सत्याग्रहापासूनच घेतली होती, असे दिसते. त्याच्या अथक प्रयत्नाने ३० जानेवारी १९०८ या दिवशी "एशियाटिक रजिस्ट्रेशन अॅक्ट" मागे घेण्यात आला. पण पुन्हा या काळ्या कायद्याचे पुनरूज्जीवन झाल्यावर चळवळ सुरू झाली. आपल्या शेकडो अनुयायांसह गांधीजी कारावासात गेले.

सत्याग्रहाची चळवळ सुरू असतांना जेंव्हा कामगारांनी संप पुकारले तेव्हा गांधीजींनी आपला मोर्चा रद्द केला आणि असे जाहीर केले की, 'प्रतिपक्षाला पेचात पकडून आपल्या मागण्या मान्य करवून घेण्याचे तंत्र खरा सत्याग्रही कधी ही अवलंबीत नाही. तो त्यांचे हृदयपरिवर्तन करू पाहतो." शेवटी इंग्रजांनी त्या काळ्या कायद्याचे रूपांतर 'इंडियन रिलिफ अॅक्ट' मध्ये केले. अश्याप्रकारे १८९४ पासून सुरू अन्यायाविरूद्ध सत्याग्रहाच्या प्रयोगाची निष्पत्ती २०–२१ वर्षांनी दिसून आली ती म्हणजे 'इंडियन रिलीफ अॅक्ट' होती.

दक्षिण आफ्रिकेतील विजयानंतर भारत देशात १९२० पासून असहकार चळवळीच्या माध्यमाने त्यांनी जन आंदोलनास प्रारंभ केले. मात्र आपली चळवळ अहिंसक असावी, भारतीयांना सत्याग्रह व अहिंसेचा खरा अर्थ समजला पाहिजे, आत्मसन्मान प्रगल्भ करून मनुष्य सुधारणा घडवून आणणे, हा त्यांच्या मनातील हेतू होता. पण जेंव्हा चळवळ थांबविण्याचा निर्णय घेतला तेंव्हा त्याच्यावर बरीच टीका करण्यात आली. मात्र त्यांच्या ह्या धैर्यपूर्ण निर्णयामुळे त्यांनी अहिंसा टिकविण्यासाठी स्वातंत्र्याची चळवळ पुढे नेली असे वाटते. हिंसाचारापासून लोकांना परावृत्त करण्यासाठी स्वतः उपोषणाचा मार्ग स्वीकारतांना दिसतात.

ई.सन १९३० साली गांधीजीच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहाची दुसरी अखिल भारतीय चळवळ सुरू झाली. महात्मा गांधीच्या काळात जे अनेक सत्याग्रह झालेत त्यापैकी काही छोटे वैयक्तिक स्वरूपाचे होते, तर काही सत्याग्रह मोठे सामूहिक स्वरूपाचे बहुजनांच्या आंदोलनासारखे होते. त्यांच्या १९२०, १९३० आणि १९४२ च्या सत्याग्रहांना Mass Movement च्या वर्गात घालता येईल. जगाच्या इतिहासात पूर्वी केंव्हा ही घडली नव्हती अशी सत्याग्रहाची घटना गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारतीय राजपटलावर पुनः पुन्हा घडली, तेंव्हा जगाच्या इतिहासात एक अव्दितीय स्थान गांधीजींना द्यावे लागते. जगातले सारे कलह नष्ट होऊन ते परस्पर प्रेमाने नांदत आहे, असे स्वप्न गौतम बुद्धाने किंवा येशू ख्रिस्ताने किंवा ज्ञानेश्वरांनी बघितले, पण गांधीजींचे वैशिष्ट्य हे की स्वप्नमय वातावरण सोडून जगातला कलह त्यांनी मान्य केला व त्यातून एक प्रेमाची वाट काढून दिली. एक आदर्शवादी चित्र म्हणून सत्याग्रहाचे महत्व आहे. या जगाला प्रगतिपथावर नेण्याचे सामर्थ्य ह्या चित्रात आहे. म्हणूनच "जगाला सांस्कृतिक प्रकाश शिखराकडे आकृष्ट करणारे एक ध्येयचित्र महात्मा गांधीजींनी पुरवले म्हणून गांधीजींना 'महामानव" म्हणायचे. त्यांच्या सत्याग्रहाच्या प्रयोगाची आज ही गरज आहे." असे म्हटल्यास अतिश्योक्तिपूर्ण ठरणार नाही.

**संदर्भग्रंथ :**


१) गांधीजी मानव कि महामानव – गोखले द. न.

२) Gandhi on Nehru - Hingorani A. T.

३) Thought's of Mahatma – Bharati K. S.

४) सत्याचे प्रयोग – मो. क. गांधी.

५) मेरे सपनों का भारत – महात्मा गांधी (आर. के. प्रभू संग्राहक)

६) महात्मा गांधीचे तत्वज्ञान (संपा. डॉ. भिसे)

७) गांधी एक युगमुद्रा – बाबा आमटे




Scanned with CamScanner